# मन की बात

खंड. १



# MANN KI BAAT

**Published by**
Amar Chitra Katha Pvt. Ltd

**Edition I**

**ISBN: 978-81-19242-21-4**

©Amar Chitra Katha Pvt. Ltd, May 2023
All rights reserved. This book is sold subject to the condition that the publication may not be reproduced, stored in a retrieval system (including but not limited to computers, disks, external drives, electronic or digital devices, e-readers, websites), or transmitted in any form or by any means (including but not limited to cyclostyling, photocopying, docutech or other reprographic reproductions, mechanical, recording, electronic, digital versions) without the prior written permission of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition being imposed on the subsequent purchaser.

# मन की बात

खंड. १



# The Route to your Roots

When they look back at their formative years, many Indians nostalgically recall the vital part Amar Chitra Katha comics have played in their lives. It was **Amar Chitra Katha** that first gave them a glimpse of their glorious heritage.
Since they were introduced in 1967, there are now over **500 Amar Chitra Katha** titles to choose from. **Over 100 million copies** have been sold worldwide.
Now, Amar Chitra Katha titles are even more widely available in **1000+ bookstores all across India**. If you do not have access to a bookstore near you, you can also buy all the titles through our online store, **www.amarchitrakatha.com**. We provide quick delivery anywhere in the world. To make it easy for you to locate the titles of your choice from our treasure trove of titles, the books are now arranged in six categories.

**Epics and Mythology**
Best known stories from the Epics and the Puranas

**Indian Classics**
Enchanting tales from Indian literature

**Fables and Humour**
Evergreen folktales, legends and tales of wisdom and humour

**Bravehearts**
Stirring tales of brave men and women of India

**Visionaries**
Inspiring tales of thinkers, social reformers and nation builders

**Contemporary Classics**
The best of modern Indian literature

**Illustrations and Cover Art:** Dilip Kadam

**Production:** Amar Chitra Katha

AMAR CHITRA KATHA PVT. LTD

© Amar Chitra Katha Pvt. Ltd, April 2023
Facebook: The Amar Chitra Katha Studio | Instagram: @amarchitrakatha | Twitter: @ACKComics | YouTube: Amar Chitra Katha

Get access to Amar Chitra Katha's digital library on the **ACK Comics App**. Visit **digital.amarchitrakatha.com**

You can now get ACK stories as part of your classroom with **ACK Learn**,
a unique learning platform that brings these stories to your school with a range of workshops.
Find out more at **www.acklearn.com** or write to us at **acklearn@ack-media.com**.

३ ऑक्टोबर २०१४ या दिवशी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या नागरिकांना एका खास गोष्टीची ओळख करून दिली.

माझ्या प्रिय देश बांधवांनो, आज विजयादशमीच्या सणाच्या निमित्ताने मी माझ्या मनातले काही विचार तुमच्याशी शेयर करणार आहे. आणि मला हे नेहमीच करण्याची इच्छा आहे. महिन्यातून किमान एक किंवा दोनदा मी तुम्हाला मन की बात च्या माध्यमातून भेटत राहण्याचा प्रयत्न करीन. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो जी स्वामींनी अनेकदा सांगितली आहे.



महिन्यातून किमान एक किंवा दोनदा मी तुम्हाला मन की बात च्या माध्यमातून भेटत राहण्याचा प्रयत्न करीन. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो जी स्वामींनी अनेकदा सांगितली आहे.

एकदा एक सिंहीण तिच्या दोन छाव्यांसाह बाहेर फिरत होती तेव्हा तिला मेंढ्यांचा कळप दिसला. तिने मेंढ्यांची शिकार करण्यासाठी पुढे उडी मारली. एक छावा तिच्यासोबत पळत गेला तर दुसरा मागे राहिला.

मागे राहिलेले पिल्लू कळपातील एका मेंढीला सापडले आणि ती तिच्या कोकरा सोबत त्याची काळजी घेऊ लागली. सिंहाचा छावा सुद्धा आपणही त्यांच्यातीलच एक आहोत असे समजून आनंदाने राहू लागला. तो त्यांच्यासारखाच बोलू लागला, त्यांच्याबरोबर खाऊ लागला आणि त्यांच्यासारखेच वागू लागला. काही वर्षांनंतर, आई बरोबर असलेला छावा मोठा झाला होता, आणि आपला भाऊ, मेंढ्यांच्या कळपात बघून त्याला खूप आनंद झाला. त्याला त्याच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता, की आपला भाऊ असा मेंढयासारखा का वागत आहे.

काय झालं आहे तुला ? तू असा का मेंढ्यांसारखा वागतो आहेस ?

कारण मी त्यांच्याच बरोबर मोठा झालो आहे. त्यांनीच मला वाढवलं आणि म्हणूनच माझ्या सगळ्या सवयी, खाणं पिणं , वागणं आणि माझी भाषा ,सगळं काही त्यांच्यासारखंच आहे.



तू चल माझ्या बरोबर, आणि मी तुला दाखवतो की तू खरा कोण आहेस ? तो छावा म्हणाला.

तो आपल्या भावाला एका विहिरीजवळ घेऊन गेला आणि त्याला स्वतःचं आणि त्याचं प्रतिबिंब दाखवलं.

बघ, आपण दोघे सारखेच दिसतो. हो ना ? तू सिंह आहेस, मेंढा नाही. नेहमी स्वतः ला मेंढा समजणारा सिंह आश्चर्यचकित झाला. त्याने स्वतःला सिंह म्हणून ओळखले. नवीन शक्ती आणि स्वाभिमानाने, त्याने आपले डोके मागे फिरवून, खऱ्या सिंहाप्रमाणे गर्जना केली.

या देशातील आपण सर्वांनी आपला स्वाभिमान आणि आत्मविश्वास परत मिळवला पाहिजे. आपली ताकद ओळखली पाहिजे. कारण आपण असे केल्यास आपण एक प्रगतीशील आणि समृद्ध राष्ट्र होऊ.


गेल्या काही वर्षांमध्ये पंतप्रधानांनी तळागाळातील अशा काही लोकांच्या कथा समोर आणल्या, जे सामान्य नागरिक असूनही त्यांच्या सहकाऱ्यांचे आणि सहप्राण्यांचे जीवन सुलभ करण्यासाठी खऱ्या आयुष्यातील नायकांसारखे काम करत होते.
आज मी तुम्हाला कर्नाटकातील दसन्नाडोडी' गावातील कामगौडाबद्दल' सांगतो. एक माणूस जो मेंढपाळ होता. उन्हाळ्यात माणसांना आणि प्राण्यांना पाणी मिळावे म्हणून त्यांनी स्वतः सोळा तलाव तयार केले
सामाजिक हितासाठी काम करणाऱ्या अनेक समूहांचा उल्लेख देखील मन की बात मध्ये केला आहे.
गेल्या आठ वर्षांपासून त्यांनी शहर स्वच्छ करण्याचे काम केले आहे आणि साडे तिनशेहून अधिक परिसरांचा कायापालट केला आहे. आज त्यांच्याकडे सुमारे दीडशे स्वयंसेवक आहेत जे दर रविवारी त्यांच्यात सामील होतात आणि रस्ते, भिंती, कचराकुंड्या इत्यादी स्वच्छ करण्यासाठी कार्यरत असतात. त्यांचे ब्रीदवाक्य 'तक्रार थांबवा, क्रिया सुरू करा' आहे.
पंतप्रधानांनी त्यांच्या श्रोत्यांना त्यांच्या स्वतःच्या उल्लेखनीय आणि प्रभावशाली भाषणातून स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या प्रचंड बलिदानाची आठवण करून दिली.
तुम्हाला माहीत आहे का की ७५ हून अधिक रेल्वे स्थानके स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित आहेत? त्यापैकी एक झारखंडमधील गोमोह' जंक्शन आहे जिथून नेताजी सुभाषचंद्र बोस वेषांतर करून निसटले आणि जर्मनीला गेले. दुसरे म्हणजे उत्तर प्रदेशातील काकोरी रेल्वे स्थानक, जिथे राम प्रसाद बिस्मिल, अशफाकुल्ला खान आणि चंद्रशेखर आझाद यांसारख्या क्रांतिकारकांनी ब्रिटिश खजिन्यातून पैसे घेऊन जाणारी ट्रेन लुटली.
काकोरी
KAKORI
एका अतिशय मनोरंजक भागामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विदा आणि सोफी या दोन सैनिकी कुत्र्यांचे देखील विशेष कौतुक केले
सोफी,विशेष फ्रंटियर फोर्स
विडा, नॉर्दर्न कमांड
सोफीने एक्सीलरंट' नावाचे स्फोटक शोधून काढले जे स्फोटक यंत्र बनवण्यासाठी वापरले जाऊ शकते. नॉर्दर्न कमांडमधील आर्मी डॉग युनिटमधील विदाने पाच माइन्स आणि एक ग्रेनेड शोधून काढले, आणि सैन्याला दुखापत होण्यापासून वाचवले.
नुकतेच, मन की बातचे शतक पूर्ण केले आहे. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी या कार्यक्रमाला पसंती दिली आहे, आहेत आणि त्यातून भारताबद्दल असामान्य अशी माहिती सुद्धा मिळवत आहेत

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | योगेश सैनी | ६ |
| २ | इस्माईल खत्री | १० |
| ३ | राजू | १३ |
| ४ | न्गुरंग मीना | १६ |
| ५ | पॉन मरीअप्पन | १९ |
| ६ | कलमानी कामेगौडा | २१ |
| ७ | प्रदीप संगवान | २४ |
| ८ | काम्या कार्तिकेयन | २७ |
| ९ | अन्वी झांजाकुरिया | ३० |

# योगेश सैनी



वर्गात खूप उत्साह होता.
नायर सर म्हणाले की पुढचा क्लास खास असणार आहे, इक्बाल.
हो ! मला ही वाटतंय की खरोखर काहीतरी मजेदार असेल,जसे की लीपफ्रॉग किंवा खोखो किंवा
इक्बाल ची लिस्ट पूर्ण होण्या आधीच ..
गुड मॉर्निंग, मुलांनो !
गुड मॉर्निंग, सर !
सर, आज आपण काय शिकणार आहोत ?
श्रेयस, मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर दुसऱ्या प्रश्नाबरोबरच देतो. तुम्ही मन की बात ऐकलं आहे का?
मी ऐकलंय सर,! हा एक रेडिओ कार्यक्रम आहे ज्यामध्ये आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्याशी बोलतात, संवाद साधतात आणि अनेक गोष्टीही सांगतात.
खूप छान विद्या. पण ते कशाबद्दल बोलतात, सांगू शकशील?
ते भारताबद्दल आणि भारतातील अशा काही लोकांबद्दल बोलतात जे असामान्य गोष्टी करत आहेत.
लक्ष्मी, होय, अगदी बरोबर!



तर, पुढील काही आठवडे दिवसातील काही वेळ आपण मन की बात कार्यक्रमा मध्ये चर्चा केलेल्या अशाच विस्मयकारक आणि असामान्य लोकांना आणि ते आपल्या देशात कसा बदल घडवून आणत आहेत त्यांच्या बद्दल बोलणार आहोत. सगळ्यात आधी, आपण ज्या व्यक्तीबद्दल बोलणार आहोत ती व्यक्ति आपल्याच शहरातील आहे; योगेश सैनी असे त्यांचे नाव आहे.
मी ऐकलं आहे त्यांच्याबद्दल. त्यांची चित्रे आमच्या शाळेसमोरील उड्डाणपुलाखाली भिंतीवर आहेत. मी रोज पाहते.
बरोबर आहे, गौरी. ते एक कलाकार आहेत, जे आपल्या शहराची स्वच्छता आणि सजावट करतात. मी तुम्हाला त्यांची गोष्ट सांगतो!
जवळजवळ २० वर्षे अमेरिकेत राहून योगेश भारतात परतला होता. एके दिवशी तो लोधी गार्डनमध्ये फेरफटका मारत होता.
आपल्याकडे अशा सुंदर सार्वजनिक जागा आहेत पण बहुतेकांना रंग नाही. हे जग खूप स्वच्छ आणि रंगीत असतं तर किती छान झालं असतं.
अरे ... माझ्या शहरात रंग भरायला मीच का नाही सुरुवात करत? मी या कचऱ्याच्या डब्यांपासूनच सुरुवात करतो. मी एखादा छोटासा कार्यक्रम आयोजित केला तर इतरही माझ्यासोबत सहभागी होतील
पुढील काही दिवसांत, योगेशला नवी दिल्ली महानगरपालिकेकडून परवानगी मिळाली आणि स्ट्रीट आर्टस् संटर्डेचे आयोजन केले. पण
असं वाटतंय की आपण दोघेच आहोत, पण हरकत नाही. चला सुरुवात करूया.


काही तासांनंतर
कीती सुंदर दिसतंय हे! या आधी हे अगदी साधे कचऱ्याचे डबे होते यावर विश्वासच बसत नाही.
आपल्याला वाटलं तर कोणतीही गोष्ट ही कॅनव्हास होऊ शकते!
आम्ही तुमच्यात सामील होऊ शकतो का? आम्हाला देखील हे आवडलं
ART DAY
आणि अशा प्रकारे हळूहळू अनेक लोक सहभागी होऊ लागले.
योगेशने या गटाला दिल्ली स्ट्रीट आर्ट' असे नाव दिले आणि त्यांनी लवकरच शहराभोवती छोट्या सार्वजनिक वास्तु सजवण्यास सुरुवात केली. एक दिवस
कदाचित आपण भिंतींवर म्युरल्सही रंगवायला सुरुवात केली पाहिजे
आणखी कलाकारांनी आपल्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे, आपण राजेंद्र नगर झोपडपट्टीपासून सुरुवात करू शकतो.
पण ती जागा खूपच अस्वच्छ आहे!
मग आपण आधी ती स्वच्छ करू.
दुसऱ्या दिवशी
कोण आहात तुम्ही? आणि इथे काय करताय?
काळजी करू नकोस मित्रा. आम्ही तुझं दुकान आणि आसपासची घरे सुंदर रंगवणार आहोत.
काही दिवसांनंतर
किती सुंदर दिसतोय हा परिसर, नाही का
होय, अगदी खरं आहे. आमची घरे आता खूप रंगीबेरंगी दिसत आहेत.


प्रत्येक म्युरलसह, दिल्ली स्ट्रीट आर्ट शहरात मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले.
आता, मला गांधीजींवर म्युरल करायचे आहे.
आणि त्याने केले सुद्धा. योगेशच्या पुढाकाराने दिल्ली शहराने राष्ट्रपिता'ची काही उल्लेखनीय भित्तीचित्रे पाहिली.
एक दिवस
माझ्याकडे, तुमच्यासाठी एक चांगली बातमी आहे. एका क्लायंटने आपल्याला बंगलोरमधील एक मोठी शाळा रंगवण्यास सांगितले आहे.
हे खूपच मस्त आहे. आपण तिथे गेल्यावर आसपासच्या काही सार्वजनिक भिंती देखील सजवू शकतो.
आणि त्यांच्या ग्रुपला अधिकाधिक काम मिळाले आणि कालांतराने ते मोठे झाले. गेल्या नऊ वर्षात त्यांनी १५ ते २० शहरांतील झोपडपट्ट्या, तुरुंग, रस्ते, रेल्वे स्टेशन, शाळा आणि इतर अनेक सार्वजनिक आणि खासगी जागांचे सुशोभीकरण केले आहे.
माझा विश्वास बसत नाही की आपल्या छोट्या टीमने अनेक शहरांमध्ये इतका बदल घडवून आणला आहे.
प्रत्येकाने आपल्या शहरासाठी असे योगदान दिले तर आपल्या संपूर्ण देशाचा कायापालट होऊ शकतो.

# इस्माईल खत्री



शारदाचा वाढदिवस होता, आणि तिने सगळ्या वर्गासाठी मिठाईचा एक छोटा डबा आणला होता.
शारदा, वाढदिवसाच्या शुभेच्छा! किती सुंदर कुर्ता घातला आहेस.
धन्यवाद !
तुम्हाला माहितीये? शारदाचा या कुर्त्याचं एक वैशिष्ट्य आहे. या प्रकाराला अजरख म्हणतात.
ती सुद्धा अजून एक मन की बात' मधलीच कथा आहे का, सर?
अगदी बरोबर, श्रेयस. मी तुम्हाला त्या माणसाबद्दल सांगतो ज्याने अजरखची' कला लुप्त होण्यापासून वाचवली.
२००१. धमडका', येथील सर्व खत्री, त्यांच्या समाजाचे प्रमुख इस्माईल खत्री यांच्याकडे आले
गेल्या दहा वर्षापासून आमच्या गावातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे.
आणि आता भूकंपामुळे, आपली उपजीविकाही गमावण्याची वेळ आली आहे.
इस्माईल भाई आता आपण सर्वजण दुसऱ्या गावात जाऊ या, असं मला वाटतं.
इस्माईलजींना कल्पना होती की त्यांची चिंता योग्य आहे.
अजराख ब्लॉक प्रिंटिंगची समाजाची पारंपारिक कला मुबलक आणि स्वच्छ जलस्रोतांवरच अवलंबून होती.
वापरलेल्या रंगांपासून ते डिझाइनच्या योग्य छपाईपर्यंत, सर्व प्रक्रियेत पाण्याचा वापर अनिवार्य होता.


ठीक आहे, मी आपल्या सर्वांसाठी योग्य जागेचा पर्याय शोधेन.
समुदायाच्या गरजा लक्षात घेऊन, इस्माईलजींना जवळ एक चांगली जागा मिळाली. नंतर गावाचे नाव अजराखपूर पडले.
इथे, आपली ही कला बहरेल.
नवीन सुरुवात त्यांच्या व्यवसायासाठी फलदायी ठरली...
पण लवकरच नवीन समस्या निर्माण झाल्या.
आज तुझे वडील कुठे आहेत?
इस्माईल भाई, अब्बा घरी आहेत. काल काम केल्यानंतर त्यांना श्वास घ्यायला त्रास व्हायला लागला.
रासायनिक रंगांमुळे कारागिरांना ॲलर्जी आणि दमा होतो. आपण यावर काय मार्ग काढू शकतो ?


आणि याचे उत्तर त्यांना निसर्गात सापडले. खत्रींनी त्याऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर करण्यास सुरुवात केली.
वाह! हा लाल खूपच उठून दिसतो आहे.
हा रंग झाडाच्या मुळांपासून तयार होतो, त्यामुळे तुम्हाला पुरळ उठणार नाही.
अशाप्रकारे, एका माणसाच्या आणि त्याच्या समुदायाच्या प्रयत्नांनी अजराख छपाईचा कालबाह्य कलाप्रकार पुन्हा जिवंत झाला.
आज, अजराखला खूप मागणी आहे आणि कारागीर वेगवेगळ्या कापडांवर आणि आधुनिक शैलींमध्ये प्रयोग करत आहेत.
या कला प्रकाराचे पुनरुज्जीवन आणि प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी, इस्माईल खत्री यांना २००३ मध्ये डी मॉन्टफोर्ट विद्यापीठ', लीसेस्टरमधून मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.
त्यांच्या या कार्याला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र आणि उत्कृष्टतेचा णछएडउज चे प्रमाणपत्र देखील मिळाले आहे.
डॉ इस्माईल खत्री यांच्या मुलांनी आणि नातवंडांनी त्यांच्या कुटुंबातील अजराख ब्लॉक प्रिंटरची अकरावी पिढी म्हणून त्यांचा वारसा अभिमानाने पुढे चालू ठेवला आहे

# राजू



नायर सर आणि त्यांचे विद्यार्थी बाहेर फेरफटका मारायला जात होते.
चल, श्रेयस. लवकर चढ, नाहीतर दुपारच्या जेवणापूर्वी काही आपण डोंगर माथ्यावर पोहोचू शकणार नाही.
माझे पाय दुखत आहेत सर. आता माझ्याच्याने अजून चालवणार नाही.
मी मस्करी करत नाहीये. माझे पाय काही केल्या ऐकत नाहीत.
तुझ्या पायांबद्दल ऐकून, मला पठाणकोट येथील राजू या मुलाबद्दल मन की बात' मध्ये ऐकलेल्या गोष्टीची आठवण झाली.
राजू लहान असतानाच त्याला पोलिओ झाला होता.
आपलं बाळ खूपच दुर्दैवी /कमनशिबी आहे. या भयंकर आजाराने त्याचे पाय निरुपयोगी झाले आहेत.
आपण शक्य तितकी त्याची काळजी घेऊ.
राजूला दोन मोठे भाऊ होते.
दुःखाची गोष्ट म्हणजे, वयाच्या १० व्या वर्षी राजूने त्याचे आई वडील दोन्ही गमावले.
राजू, आता तुला तुझी काळजी स्वतःच घ्यावी लागेल, कारण आम्हाला कामासाठी बाहेर पडावंच लागेल.
आता माझी काळजी घ्यायला कोणी नाही. मला स्वतःची काळजी घ्यावी लागेल.
त्यामुळे –
प्लीज सर, मी टेबल साफ करीन आणि फरशी झाडून घेईन. मी कोणतंही काम करीन आणि मेहेनत करीन.
नाही, नाही! तुला तर धड चालता सुद्धा येत नाही. मला उगाच तुझी जवाबदारी घ्यावी लागेल.


निराश आणि हताश, राजूला अखेर भीक मागण्याशिवाय पर्याय उरला नाही.
माझ्या भावांची कुटुंबे आहेत पण मी त्यांच्यावर ओझे होऊ शकत नाही. पण मी अशी हार मानू शकत नाही.
साहेब, फक्त एक रुपया द्या.
हे घे.
राजू रोजच्या रोज धंगू रोडवर बसून भीक मागू लागला. लवकरच, लोक चांगल्या स्वभावाच्या या तरुणाला ओळखू लागले आणि त्याला उदार होऊन मदत करू लागले.
मी रोज किमान ५०० ते ७०० रुपये कमावतोय. मला माझ्यासाठी फक्त २०० हवे आहेत. मी बाकीचे वाचवीन आणि इतरांना मदतही करू शकीन.
आणि, राजूचा इतर गरजूंना मदत करण्याचा प्रवास सुरू झाला.
भाऊ, तुम्ही आमच्यासारख्या गरीब पालकांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी मदत करता असे ऐकले आहे. तुम्हीही आम्हाला मदत कराल का?
मला तुमच्या गरजा सांगा आणि तुमच्या मुलीला तिच्या वैवाहिक जीवनाची चांगली सुरुवात करण्यासाठी मी जे काही करता येईल ते करेन.
राजूने कुटुंबाला ११०० रुपये, ५० किलो तांदूळ आणि एक पंखा दिला.


राजूने केवळ विवाहांमध्येच मदत केली नाही तर कोविड काळात २५०० मास्कचे वाटपही केले
मास्कशिवाय फिरू नका. इथे माझ्याकडून एक घ्या. आजारी पडू नका. स्वतः ची काळजी घ्या.
धन्यवाद, राजू!
जेव्हा धंगू रोडवरील पुलाचे नुकसान झाले; तेंव्हा राजूने तो दुरुस्त करून घेतला.
राजूने त्याच्या बचतीतून ३०,००० रुपये आम्हाला पुलाच्या दुरुस्तीसाठी दिल्याबद्दल आम्ही त्याचे आभारी आहोत.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या रेडिओ कार्यक्रमात राजूबद्दल सांगितल्यानंतर, राजूला भेटायला लोकांची गर्दी उसळली.
राजू तू आमच्यासाठी प्रेरणा आहेस.
आम्हाला असा आधार दिल्याबद्दल आम्ही तुमचे सदैव ऋणी राहू.
आपण सगळेच काही ना काही नक्की करू शकतो. मोठी कामे करण्यासाठी फक्त थोडेसे प्रयत्न आणि थोडीशी करुणा लागते.

# न्गुरंग मीना



गुरमीत, तू गोष्टींचं पुस्तक वाचते आहेस का? हे शाळेच्या पुस्तकासारखं दिसत नाहीये.
सॉरी सर! तुम्ही येईपर्यंत मी माझ्या लायब्ररीचे पुस्तक वाचत होते. आता मी बंद करते.




तुम्हाला लायब्ररीची पुस्तके वाचताना पाहून मला खूप आनंद झाला. आजची मन की बात ही कथा अरुणाचल प्रदेशातील आहे. आणि त्याचा लायब्ररीशी खूप जवळचा संबंध आहे!
सर, सांगा ना ती गोष्ट !




न्गुरंग मीना हे अरुणाचल प्रदेशातील निरजुली मधील रायो या छोट्या गावातील सरकारी शाळेत शिक्षिका आहेत.




मीना शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाबद्दल खूपच आग्रही होत्या. म्हणून, त्यांनी २०१४ मध्ये न्गुरंग लर्निंग इन्स्टिट्यूट नावाने एनजीओ सुरू केला.
माझे लहान वयातचं लग्न झाले. आता माझ्या पतीचे निधन झाले आहे. मी एकटी आमच्या कुटुंबाची काळजी कशी घेणार?
काळजी करू नकोस,आपण काहीतरी मार्ग काढू.
एनजीओच्या माध्यमातून मिना यांनी, अनेक महिलांना मदत केली ज्यांना समाजातील अन्यायकारक रूढी परंपरांमुळे, किंवा बळजबरीने विवाह, बहुपत्नीत्व आणि बालविवाह यासारख्या अडचणींचा सामना करावा लागला.


एकदा, कोविड-१९ लॉकडाऊन दरम्यान, मीना तिचा मित्र, देवांग होसाईशी बोलत होती.
मुलांना जास्तीत जास्त वाचनाची आवड लावण्याची हीच योग्य वेळ आहे. त्यांच्यापर्यंत पुस्तके पुस्तके पोचली पाहिजेत, असे मला वाटते पण आपल्या गावात लायब्ररीज् नाहीत.
खूप छान कल्पना आहे देवांग. पण मग, आपण नक्की काय करू शकतो?
थोड्या वेळाने
देवांग, आयझॉल' मध्ये आपण पाहिलेली रस्त्याच्या बाजूला असलेली लहानशी लायब्ररी आठवते का?
हो, त्याचं काय?
इथे तशी रस्त्यावर वाचनालये बांधली तर? लोक पुस्तके घरी घेऊन जाऊ शकतात आणि दोन आठवड्यांत परत करू शकतात.
अतिशय उत्तम कल्पना आहे !
अशा प्रकारे स्व-चलित ग्रंथालये स्थापन करण्याचा विचार सुरू झाला.
हे काय आहे?
एक छोटेसे बुकशेल्फ दिसते. हे असं रस्त्याच्या कडेला का आहे?
चला ना, बघूया का ?
लवकरच, लायब्ररी लोकांमध्ये खूप लोकप्रिय झाली.
आमची मुले आजूबाजूला जमतात आणि वाचतात हे पाहून खूप आनंद झाला!
या लायब्ररीतली खूप छान आहेत. ही पुस्तके कोणत्याही वयोगटातील व्यक्ती वाचू शकतात.
लायब्ररीला कोणतेही शुल्क किंवा वर्गणी नव्हती. पुस्तक घेतल्यानंतर दोन आठवड्यांच्या आत लोकांना पुस्तके परत करणे अपेक्षित होते.


मीना, एखाद्याने घेतलेली पुस्तके परत केली नाहीत तर?
ठीक आहे. शेवटी, त्यांना त्याचा फायदा होत आहे. त्यासाठीच तर आपण हा उपक्रम सुरू केलाय ना?
हा किती चांगला विचार आहे?
मीना आणि देवांग यांच्या पुढाकाराला अनेक स्थानिकांच्या सदिच्छाने पाठिंबा दिला आणि ही कल्पना फारच लोकप्रिय झाली.
मीना, ही माझ्या मुलांची जुनी पुस्तके आहेत. मी ते तुमच्या लायब्ररीला दान करू इच्छितो.
धन्यवाद सर!
त्यांना लायब्ररीसाठी अधिक पुस्तके खरेदी करण्यासाठी पैसे आणि निधी देखील मिळाला आहे.
मीना यांना विश्वास आहे की वाचन संस्कृती लोकांमध्ये जागृकता तर वाढवेलच, आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगले काम करण्यास प्रोत्साहित करेल.
माझ्या प्रिय अरुणाचलच्या बांधवांनो, जरा विचार करा. काही अडचणी असतील, तर त्यावर केवळ सरकारनेच काही केले पाहिजे असे नाही. आपण व्यक्ती म्हणून, आपल्या राज्याचे नागरिक या नात्याने आपण मागे का पडत आहोत हे जाणून घेतले पाहिजे. त्यामुळे दोषारोपाचा खेळ थांबवा आणि काहीतरी करायला सुरुवात करा.
0:35/4:13
मीनाला राज्यभरात आणखी ग्रंथालये बांधण्याची आशा आहे आणि तिचा हा उपक्रम देशभरातील अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# पॉन मरीअप्पम



सुजीत, तुझा नवा हेअरकट खूप स्मार्ट दिसत आहे!
हा हा! ही लेटेस्ट स्टाइल आहे सर.
सुजित फिल्मस्टार सारखा दिसायचा प्रयत्न करतोय, सर!
जर तुम्ही पॉन मरियप्पन न्हाव्याच्या दुकानात गेला असता, तर त्याने तुम्हाला चांगले केस कापून दिले असते आणि बरीच पुस्तकेही दिली असती. पंतप्रधानांनी त्यांच्या रेडिओ टॉकवर त्यांची गोष्ट सांगितल्यानंतर ते खूप प्रसिद्ध झाले आहेत.
पॉन मरियप्पन तामिळनाडूमधील थुथुकुडी शहराचा आहे. जेव्हा तो आठव्या इयत्तेत शिकत होता, तेंव्हा –
बेटा, मला तू आपल्या कुटुंबासाठी कमाई करून, मला हातभार लावावास असं वाटतं. माझी एकट्याची कमाई आपल्याला पुरेशी नाही.
हो बाबा, मी नक्की करीन. काळजी करू नका.
मला माझी पुस्तके आवडतात आणि मला अभ्यास करायचा आहे पण मला अप्पांना मदत करायची आहे.
पॉन मरियप्पनने हेअरड्रेसिंग सलून सुरू केले आणि काहीच दिवसात चांगली कमाई देखील करू लागला.
जेंव्हा मी शिकलेल्या लोकांना बघतो तेंव्हा मला माझ्या आयुष्यातल्या त्या उणीवेची तीव्र जाणीव होते. माझं सलून असं असलं पाहिजे, जिथे लोक फक्त केस कापायला येणार नाहीत तर मी त्यांना त्या बरोबरच अजूनही काही देऊ शकेन.


म्हणून, पॉनने त्याच्या सलूनमध्ये एक लायब्ररी तयार केली जिथे त्याच्याकडे प्रत्येक वयोगटासाठी सर्व प्रकारची पुस्तके होती.
कन्ना, पॉन काका माझे केस कापत असताना इकडे तिकडे धावू नकोस.
मी काहीही करणार नाही. माझ्यासाठी इथे वाचण्यासाठी खूप गोष्टींची पुस्तके आहेत.
होय, हे खरे आहे. मी मरियप्पनच्या सलूनमध्ये संपूर्ण दिवस घालवू शकतो. हाहाहा!
एक अजून फायदा देखील आहे. तुम्ही वाचलेल्या पुस्तकाचे छोटेसे समीक्षण लिहू शकलात तर, मी तुम्हाला तुमच्या पुढील केस कापण्याच्या किमतीवर सवलत सुद्धा देईन.
त्यामुळे मला अधिकाधिक पुस्तके वाचायला मिळतील!
अधिकाधिक लोकांनी पुस्तके वाचावीत अशी माझी इच्छा आहे. आणि त्याच हेतूने मी ही सुरुवात केली आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात' या कार्यक्रमात पॉन मरियप्पन यांची मुलाखत घेतली होती.
मरियप्पन जी, तुमचे आवडते पुस्तक कोणते आहे?
Thirukkural
माननीय पंतप्रधान साहेब, थिरुक्कुरल हे माझे आवडते पुस्तक आहे.
काही बदल घडवून आणण्यासाठी कोणीही लहान मोठा नाही. तुम्हाला फक्त वेगळा विचार करण्याची आणि जीवनातील आव्हानांना, संधी समजून त्यावर विजय मिळवून परिस्थिति बदलण्याची गरज आहे.

# कलमानी कामेगौडा


शाळेत सुट्टीची वेळ होती
काय करतेस, लक्ष्मी?
हे चिमण्यांसाठी आहे. बाहेर खूपच गरम आहे. त्यांना तहान लागेल.
पारुलनेही मदत करायचं ठरवलं आणि लवकरच, विद्यार्थ्यांचा एक छोटा समूह वाटीत पाणी गोळा करू लागला.
इथे काय चाललंय?
सर आम्ही पक्ष्यांसाठी पाणी ठेवतो आहे.
या उन्हात पक्षी खरोखर तहानलेले दिसत होते . म्हणून, मला वाटले की आपण थोडी मदत करू शकतो. आम्ही त्यांच्यासाठी आणखी काही करू शकत नाही, तरीही!
लक्ष्मी, ही खूपच सुंदर भावना आहे. परंतु जर लोकांना हवे असेल तर ते इतर सजीवांच्या प्रजातींच्या कल्याणासाठीही बरेच काही करू शकतात. आत या, नीट बसा. मी तुम्हाला कामगौडाची गोष्ट सांगतो, ज्यांचे मन की बातमध्ये आमच्या पंतप्रधानांनीही कौतुक केले होते.
कलमाने कामगौडा हा एक मेंढपाळ होता जो कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यातील दसनदोड्डी गावात राहत होता.
ह्र... ह्र... लवकर ये, शांता! तू नेहमीप्रमाणे मागे राहिली आहेस.


कुंडुरु बेट्टाच्या जवळच्या टेकडीभोवती मेंढ्या चारण्यात तो आपला बहुतांशी दिवस घालवत असे. एक दिवस –
खूप गरम आहे आणि या टेकडीवर पाण्याचा थेंबही नाही.
अगदी तेंव्हा –
तू खूप थकलेला दिसतोस.तुलापण माझ्यासारखीच तहान लागली आहे का? मी निदान माझ्या मेंढ्यांसह माझ्या गावात परत जाऊन पाणी पिऊ शकतो, पण तुम्ही गरीब प्राणी काय करणार?
कामगौडा बरेच दिवस यावर विचार करत राहिला
मी इथे एक मोठा खड्डा खणून पाण्याने भरणार आहे, म्हणजे तुम्हा प्राण्यांना पुन्हा कधीही तहानलेलं राहावं लागणार नाही.
पण काही केल्या तो खड्डा भरत नव्हता किंवा भरला तरी ,काही तासांतच पाण्याचे बाष्पीभवन व्हायचे किंवा पाणी वाहून जायचे.
खूप विचार केल्यानंतर
मला माफ कर, कमला. तलाव खोदण्यासाठी अवजारे घेण्यासाठी मला तुला आणि तुझ्या बहिणींना विकावे लागेल. पण तुम्हाला आणि आणि इतर प्राण्यांना मदत करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.
लवकरच, त्याने पुरेसा ओलावा असलेल्या जमिनीचा तुकडा निवडला आणि खणायला सुरुवात केली. पण
लवकरच, त्याने पुरेसा ओलावा असलेल्या जमिनीचा तुकडा निवडला आणि खणायला सुरुवात केली. पण


अनेक महिन्यांच्या कठोर परिश्रमा नंतर –
आता मला फक्त पावसाळ्याची वाट पाहायची आहे. वरुणदेवा ने आशीर्वाद दिला तर हा तलाव पाण्याने भरून जाईल.
आणि लवकरच
माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही. तुम्ही सगळे प्राणी हे पाणी प्या. हे सर्व तुमच्यासाठी आहे!
गुरे, मेंढ्या, शेळ्या आणि वन्य प्राणी देखील तलावाचे पाणी पिऊ लागले.
ही फक्त सुरुवात होती. पुढील ४० वर्षात, कामगौडा यांनी १६ तलाव तयार करण्यासाठी १५ लाखांपेक्षा जास्त खर्च केले, ज्यामुळे ते कर्नाटकातील पोंड मॅन म्हणून लोकप्रिय झाले.
मी एक रिपोर्टर आहे आणि मला तुमची कथा जाणून घ्यायची आहे. मला सांगा या तलावांमध्ये काय विशेष आहे?
डोंगरावरून पाणी वाहून तलाव भरतात. एक तलाव भरला तर तो दुसऱ्या तलावात वाहून जातो. हे सर्व तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत आणि त्यामुळे उन्हाळ्यातही ते कोरडे पडत नाहीत.
डोंगरावरून पाणी वाहून तलाव भरतात. एक तलाव भरला तर तो दुसऱ्या तलावात वाहून जातो. हे सर्व तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत आणि त्यामुळे उन्हाळ्यातही ते कोरडे पडत नाहीत.
त्यांच्या प्रचंड प्रयत्नांसाठी, कामगौडा यांना बसवश्री पुरस्कार आणि कर्नाटक राज्योत्सव पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले.
मी पुरस्काराची रक्कम अधिक तलाव बांधण्यासाठी आणि झाडे लावण्यासाठी वापरू शकेन.
कामगौडा, ऑक्टोबर २०२२ मध्ये वयाच्या ८४ व्या वर्षी निधन होईपर्यंत तलावांवर काम करत राहिले. पण मंड्यातील एका छोट्या गावातल्या या माणसाची कहाणी देशभरातील सर्व पर्यावरणप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

# प्रदीप संगवान



संपूर्ण वर्ग नायर सर येण्याची वाट पाहत होता. दरम्यान, सुजीतने एक खेळ सुरू केला होता.
चूक , पारुल ! माझ्याकडे लक्ष दे , माझे लक्ष्य अचूक आहे.!
हं, दाखव बघू !
मुलांनो, तुम्ही काय पसारा घातला आहे! आमची आजची कथा अशा लोकांबद्दल आहे जे पसारा करतात आणि मग तो साफ सुद्धा करतात.
सॉरी सर! मी साफ करीन.
माझी गोष्ट संपल्यावर सगळे मिळून साफ करा. आता बसा.
२००९ मध्ये, मित्रांचा एक गट सूरज ताल येथे ट्रेकला जात होता. सगळं दृश्य कसं अगदी चित्रासारखं सुंदर दिसत होतं.
सगळीकडे नुसते कचऱ्याचे ढीग आहेत.
हा माणूस प्रदीप सांगवान होता, निसर्गावर मनापासून प्रेम करणारा गिर्यारोहक.
या ट्रेकमध्ये प्रदीपला गड्डी समाजातील काही लोक भेटले. त्यांच्या जीवनशैलीने तो थक्क झाला.
ते निसर्गाशी इतके एकरूप होऊन जगतात! निसर्गाला कोणतीही इजा न करता, कोणतंही प्रदूषण न करता ते दररोज या पायवाटा पार करतात.




*मनालीमधील प्रसिद्ध धबधबा


ते निराशाजनक दिवस होते...
हिमालय स्वच्छ करण्यासाठी संपूर्ण आयुष्य लागेल असं वाटतंय.
पण प्रदीप आणि त्याच्या टीमने हार मानली नाही, ते नेमाने आणि चिकाटीने हे काम करत राहिले.
जेव्हा आपण एकत्र काम करतो तेव्हा मला नेहमी बोगद्याच्या शेवटी प्रकाश दिसतो.
मी दुसरी बॅग घेईन, प्रदीप
समुदायाच्या आणि सहकार्याच्या पाठिंब्याने, त्यांनी हिमालयीन प्रदेशातील अनेक गावांमध्ये कचरा व्यवस्थापन केंद्रे स्थापन केली.
कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी ही सुरक्षित ठिकाणे तर आहेतच, शिवाय ते स्थानिकांना रोजगारही देतील.
प्रदीपची अशी आणखी केंद्रे स्थापन करण्याची योजना आहे.
हिलिंग हिमालयाज् ने आजपर्यंत हजारो झाडे लावली आहेत आणि सुमारे आठ लाख किलो नॉन-बायोडिग्रेडेबल कचरा साफ केला आहे.
हा प्रवास सुरू केल्यापासून मी मागे वळून पाहिले नाही. बरेच काही करणे आवश्यक आहे आणि आत्ता कुठे फक्त सुरुवात केली आहे.



काम्या कार्तिकेयन
अखंड बडबड आणि गोंधळाच्या आवाजाने वर्ग भरला होता. उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू होण्याच्या आदल्या दिवशीचा दिवस होता.
हा वर्ग पोपटांच्या कळपासारखा वाटतो आहे. तुम्हाला तरी कुणाला एकमेकांचं काही ऐकू येतं आहे का?
सर, मी माझ्या चुलत भावासोबत ट्रेकला जात आहे! आम्ही पश्चिम घाटावर जाणार आहोत.
जरा शांत व्हा. आपल्या पंतप्रधानांनी मन की बातमध्ये सांगितलेली ही प्रेरणादायी गोष्ट मी तुम्हाला सांगतो ती ऐका. हे एका तरुण मुलीबद्दल आहे जिने अनेक पर्वत पादाक्रांत केले आहेत.
काम्या तीन वर्षांची होती जेव्हा तिचे वडील, भारतीय नौदलात अधिकारी होते, ते लोणावळा येथे तैनात होते. आठवड्याच्या शेवटी, ते जवळच्या पायवाटेने लांब चालत जात असत.
अप्पा, पुढच्या वेळी त्या रस्त्याने जाऊया.
माझी मुलगी माझ्या सारखीच साहसी आहे !
जसजसा वेळ निघून गेला, काम्याच्या वडिलांनी हिमालयात मोठमोठ्या मोहिमा सुरू केल्या.
अम्मा, अप्पा परत यायला किती वेळ आहे ?
एक महिना, काम्या.


आणि माझ्या आप्पांना आपल्यापासून दूर नेणाऱ्या या पर्वताबद्दल मला फार कुतूहल आहे.
चल, आपण शोधूया का?
काम्याच्या आईने ठरवले की या काम्याने आता ट्रेकिंगचा अनुभव घेण्याची योग्य वेळ आली आहे.
लवकरच -
अद्भुत आहे ना?
हे जगाच्या वर आहे असं वाटतं आहे.
वयाच्या सातव्या वर्षी तिने उत्तराखंडमधील चंद्रशिला शिखरावर चढाई केली.
दोन वर्षांनंतर काम्याने लडाखमधील स्टोक कांगरी पर्वतावर चढाई केली होती.
माझा पहिला ६,००० मीटर ट्रेक !
हुर्रे!
लवकरच, तिने एक वैयक्तिक मिशन सुरू केले, साहस !
मला सातही खंडातील सर्वोच्च शिखरे चढायची आहेत आणि उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर स्कीईंग करायचे आहे.
मिशन साहस, हे नाव काम्या ने दिलं आहे. जे एक्सप्लोरर्स ग्रँड स्लॅम अर्थात गिर्यारोहकांचे आकर्षण म्हणून प्रसिद्ध आहे.


२०२२ पर्यंत, काम्याने सात शिखरांपैकी पाच शिखरे सर केली आहेत.
TANZANIA
आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलीमांजारो
माउंट एल्ब्रस, युरोपमधील सर्वोच्च शिखर
माउंट कोशियुस्को, ऑस्ट्रेलियातील सर्वोच्च शिखर
माउंट अकोन्कागुआ, दक्षिण अमेरिकेतील सर्वोच्च शिखर
माउंट डेनाली, उत्तर अमेरिकेतील सर्वोच्च शिखर
माउंट अकॉनकागुआ जिंकणारी ती सर्वात लहान मुलगी आणि माउंट एल्ब्रसच्या शिखरावरून स्की करणारी सर्वात लहान मुलगी आहे.
तिच्या दुर्दम्य आशावादासाठी आणि ध्येयासक्ती साठी तसेच, पर्वतारोहणातील या उत्तुंग कामगिरीसाठी, भारत सरकारने तिला पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले.
(NIC)
BARAMULLA
पर्वतांबद्दलच्या आकर्षण आणि प्रेमामुळे कौटुंबिक साहस म्हणून जे सुरू झाले ते एक इतिहास रचण्यास कारणीभूत ठरले, कारण काम्याने आणखी विक्रम मोडले आणि सर्वोच्च शिखरे जिंकणे सुरूच ठेवले आहे .

# अन्वी झंझारुकीया













*डाऊन्स सिंड्रोम हा एक अनुवांशिक विकार आहे ज्यामुळे शारीरिक आणि बौद्धिक विकास अतिशय कमी आणि फारच मंद गतीने होतो.

* जन्मजात हृदय दोष म्हणजे जन्मापासून अस्तित्वात असलेल्या हृदयाच्या रचनेतील समस्या.


अन्वी जसजशी मोठी झाली, तसतशी तिच्या वयाची इतर मुले सहज करू शकतील अशा सोप्या गोष्टी करण्यासाठी तिला खूप कष्ट घ्यावे लागत.
काहीतरी बोल. माझ्याशी बोल. कधी बोलायला सुरुवात करणार?
अन्वी १० वर्षांची असताना
बघितलंस का?
काय?
बघ किती लवचिक आहे ती! कदाचित ती योगा शिकू शकेल.
छान आयडिया आहे! त्यामुळे तिच्या हेल्थवर पण चांगला परिणाम होईल.
अवनीच्या विनंतीवरून, अन्वीच्या शाळेतील योग शिक्षिका नम्रताने तिला प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली.
हळू हळू पायाच्या बोटांकडे वाकण्याचा प्रयत्न करा.


काही आठवड्यांनंतर –
कसं चाललंय?
तिच्यासाठी हे सगळं खूप कठीण आहे. पण ती खूप जिद्दी आहे.
अन्वीने दररोज सकाळी एक तास आणि संध्याकाळी एक तास योगासन करायला सुरुवात केली. एक दिवस –
आई...
अन्वीने योग स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे.
माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नाहीये! मी खूप खूप खुश आहे.
पुढील तीन वर्षात अन्वीने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये तीन सुवर्ण आणि दोन कांस्य पदकांसह ५१ पदके जिंकली. डिसेंबर २०२१ मध्ये –
सर्वोत्कृष्ट सर्जनशील दिव्यांग बालकाचा राष्ट्रीय पुरस्कार अन्वी झांझारुकिया यांना प्रदान केला जात आहे.
जानेवारी २०२२ मध्ये अन्वीला प्रधान मंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पण तिचे स्वप्न काही महिन्यांनंतर सत्यात उतरले, जेव्हा तिला पंतप्रधान कार्यालयातून भेटण्यासाठी आमंत्रण देणारा फोन आला.
तुझ्यामुळे भारताला हा सन्मान मिळाला आहे. आम्हाला त्याचा खूप अभिमान आहे. तुझ्या पुढे एक उज्ज्वल भविष्य आहे!
धन्यवाद.
तिची इच्छा आता स्वतः पंतप्रधानांसोबत योगासन करण्याची आहे.





# मन की बात

## खंड. १

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा मासिक आकाशवाणी चा कार्यक्रम सुरू केला, तेंव्हा ३ ऑक्टोबर २०१४ रोजी मन की बात' हा कार्यक्रम त्यांना हवा होता. हे एक व्यासपीठ आहे जिथे माननीय पंतप्रधान थेट लोकांशी संवाद साधतात. त्यांच्या मनातील समस्यांबद्दल त्यांच्याशी बोलतात.

एप्रिल २०२३ मध्ये त्यांनी या कार्यक्रमाचे १०० भाग पूर्ण केले. ज्या द्वारे त्यांनी सर्वसामान्य नागरिकांनी केलेले प्रेरणादायी कार्य भारताच्या जनतेसमोर आणले. अनेक व्यक्ती आणि संस्थांनी मिळवलेले यश आणि राबवलेले उपक्रम त्यांनी जनसामान्यांपर्यत पोचवले. अपंगत्व, दारिद्र्य आणि नैराश्य यावर मात करून त्यांनी इतरांना, उत्कटता आणि आत्मविश्वासाने अशक्यप्राय गोष्टी साध्य करण्यासाठी प्रेरित केले. ध्येय गाठण्यासाठी फक्त इच्छाशक्तिच्या जोरावर ज्यांनी इतरांना प्रेरणा दिली त्यांच्याशी मुलाखती द्वारे प्रत्यक्ष संवाद साधला.

सांस्कृतिक मंत्रालयासह अमर चित्र कथा सादर करत आहे मन की बात पहिल्या १२ कथांच्या निवडीवर आधारित १२–कॉमिक मालिकेतील 'मन की बात' चा पहिला भाग !



₹९०

ISBN 978-81-19242-21-4